महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: डीआरए-०५२२/प्र.क्र.८८/२०२२/२१ दिनांक :- २७ जुलै, २०२३

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**विषय :-** विशिष्ट शैक्षणिक अर्हता आणि / अथवा अनुभवावर आधारित चाळणी परीक्षेच्या निकालाबाबत.

**संदर्भ :-**जाहिरात क्रमांक- ७०/२०२२

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे आयोजित वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी गट- ब, (जाहिरात क्रमांक ७०/२०२२) या चाळणी परीक्षेचा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

२. प्रस्तुत निकालानुसार प्रथमदर्शनी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता तपासल्यानंतर पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीस बोलविण्यात येईल. जाहिरातीमधील तरतुदीनुसार विविध दावे तपासताना वा अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी, कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

३. प्रस्तुत परीक्षेचा निकाल मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई तसेच खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल झालेल्या विविध न्यायालयीन प्रकारणांच्या अंतिम आदेशांच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात आला आहे.

४. मुलाखतीचा तपशीलवार कार्यक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येईल.

उपसचिव
परीक्षा राजपत्रित
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण- नवी मुंबई